# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१४/ 689

दिनांक 29 JAN 2014

प्रति,

प्राचार्य,

शासकीय, अशासकीय अनुदानित,

विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था

औरंगाबाद विभाग

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता शासकीय, अशासकीय अनुदानित तसेच विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना प्रथम/द्वितीय पाळी करीता मुदतवाढीबाबत...**

संदर्भ :- १.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/एनजीपी/२०१४-१५/६६ दिनांक २८/०१/२०१४

२.अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेमार्फत निर्गमित जाहिर सूचना २०१४-१५

३.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/२०१२/१३४३ दिनांक ११/१२/२०१२

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेमार्फत शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्रवेशक्षमता वाढ/घट, नवीन अभ्यासक्रम, मुदतवाढ देणे इ.बाबत संदर्भान्वये जाहिर सूचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

तरी वरील अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित तसेच विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या ज्या संस्थाना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेमार्फत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. अशा संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता प्रथम/द्वितीय पाळी करीता मुदतवाढीसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या जाहिर सूचनेनुसार तात्काळ कार्यवाही करावी. मुदतवाढीचे प्रस्ताव सादर करतांना ज्या संस्थेत प्रथम पाळीमध्ये अभ्याक्रम मंजूर नाहीत अशा संस्थांनी थेट द्वितीय पाळीसाठी प्रस्ताव सादर करू नयेत, ही बाब ध्यानात घ्यावी. कोणत्याही पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेमध्ये प्रथम/द्वितीय पाळीकरीता मुदतवाढी शिवाय शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेश झाल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांची वैयक्तिक राहील, याची संबधीत संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

पुढे असेही कळविण्यात येते की, संदर्भाधीन २ च्या पत्र/पृष्ठांकन पत्रान्वये देण्यात आलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद, जिंतुर, बीड या शासकीय संस्थेमध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्याकरीता द्वितीय पाळी सुरू करण्याच्या दृष्टीने, ज्या संस्थांमध्ये परिषदेमार्फत द्वितीय पाळीस मान्यता असल्यास मुदतवाढीसाठी व परिषदेमार्फत द्वितीय पाळी मंजूर करण्यात आली नसल्यास द्वितीय पाळीसाठी, प्रथम पाळीमध्ये सुरू असलेले अभ्यासक्रम प्रस्तावित करून परीषदेची मान्यता घेण्याबाबतच्या सूचनाही या पत्रान्वये देण्यात येत आहे.

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.

प्रत १- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना प्रत देऊन सुचित करण्यात येते की, सदरील पत्र हे या कार्यालयाच्य संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.